महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठयाबाबत प्रस्तावित निविदा प्रक्रियेसंदर्भात खरेदी समितीच्या दि.२५/०२/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. इबांका-२०१८/प्र.क्र.१३३/काम-७, दिनांक २३/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर खरेदी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

खरेदी समितीच्या दि. २५/०२/२०१९ रोजीच्या बैठकीस खालील निविदा समिती सदस्य उपस्थित होते.

अ.क्र.	सदस्यांचीनावे	पदनाम	पद
१	मा. श्री. आर. आर. जाधव	कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य	अध्यक्ष
२	श्री. शशांक साठे	उपसचिव (कामगार) विभाग	सदस्य
३	श्री. श्री. चु. श्रीरंगम	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	सदस्य सचिव
४	श्री. अशोक तांबे	लेखा अधिकारी	सदस्य

उद्योग सहसंचालक, मुंबई यांना बैठकीस उपस्थित राहणेबाबत श्री. तांबे, सदस्य, खरेदी समिती यांनी दि.२२/०२/२०१९ रोजीचे पत्र ई-मेलद्वारे पाठविले आहे. तसेच, दि.२५/०२/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता दूरध्वनीवरून उद्योग सहसंचालक यांच्या वतीने निविदा प्रक्रियेसाठी नियुक्त श्री. घुगे, सहाय्यक संचालक, उद्योग विभाग यांना संपर्क साधला. तथापि, उद्योग सहसंचालक कार्यालयातील कोणीही खरेदी समितीच्या बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

सदस्य सचिव, खरेदी समिती यांनी सदर बैठकीच्या सुरूवातीस सादर केले की, निविदा खरेदी समितीच्या दि. १८/०२/२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र इमारत व इतरबांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन पुरविणेकरीता संस्था निश्चिती व दरस्विकृतीबाबतचा प्रस्ताव मंडळाचे पत्र क्र.मइवइबाकम/मध्यान्ह भोजन/३८/२०१९ दिनांक २०/०२/२०१९ अन्वये शासन निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची प्रत मा. खाजगी सचिव, मा. मंत्री महोदय कामगार विभाग, मंत्रालय मुंबई व सर्व खरेदी समिती सदस्यांना अग्रेषित करण्यात आली होती.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या पत्र क्र.इबांका-२०१८/प्र.क्र.५२/काम-७ दि.२१/०२/२०१९ अन्वये "खरेदी समितीच्या दिनांक १८.०२.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. २ मध्ये ई-निवीदा प्रक्रियेबाबत ५ बाबी निदर्शनास आल्याचे नमूद केले आहे. त्या मुद्यांबाबतची वस्तुस्थिती कृपया कळविण्यात यावी. तसेच, दिनांक १८.०२.२०१९ रोजीच्या बैठकीच्या वेळी समिती समोर अंतिम दर प्राप्त नव्हते. सदर दर दिनांक २०.०२.२०१९ रोजी प्राप्त झाले आहे. त्यामुळे, त्या दरांबाबत समितीचे कोणतेही अभिप्राय / शिफारस प्रस्तावात नमूद नाही. तरी, खरेदी समितीची बैठक आयोजित करुन दिनांक २०.०२.२०१९ रोजी प्राप्त झालेल्या दरांबाबत समितीचे अभिप्राय / शिफारस शासनास अवगत करावे", असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरून आजची खरेदी समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

शासनाच्या दि.२१/०२/२०१९ रोजीच्या पत्रातील मुद्यांसंबंधात सदस्य सचिव खरेदी समिती यांनी खालीलप्रमाणे बाबी बैठकीत विशद केल्या.

१. खरेदी समितीच्या दि.१८/०२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र.०२ मध्ये नमूद ई-निविदा प्रक्रियेबाबत ०५ (अ,ब,क,ड व इ) मुद्दे व त्याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	मुद्दा	वस्तुस्थिती
अ)	मा. खासदार राजू शेटटी यांनी मध्यान्ह भोजन पुरवठयाच्या निविदा प्रक्रियेबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांना दि.२१/०५/२०१८ रोजी लिहलेले व मा. प्रधान सचिव, कामगार यांना दि.०१/१०/२०१८ रोजी लिहलेले पत्र.	मा. राजू शेटटी, लोकसभा सदस्य यांनी त्यांच्या दि.०१/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या विविध मुद्यांवर शासनाच्या दि. २९/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.
ब)	विधीमंडळाच्या सन २०१८ च्या नागपूर येथील पावसाळी अधिवेशनात मध्यान्ह भोजन पुरवठयाच्या निविदा प्रक्रियेबाबत मा. माजी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी चर्चेत उपस्थित केलेले मुद्दे.	भोजन पुरवठयाच्या निविदा प्रक्रियेबाबत मा. श्री. अजित पवार विधाससभा सदस्य यांनी नागपूर येथील जुलै २०१८ मधील पावसाळी अधिवेशनात चर्चेदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात मा. मंत्री महोदय कामगार यांनी विधीमंडळात उत्तर दिले आहे.

क)	उपरोक्त अ) व ब) बाबत माहे जुलै २०१८ मध्ये झी २४ तास या दूरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातम्या.	दि.०५/०५/२०१८ रोजी झी २४ तास या दूरचित्रवाहिनीवर प्रसिध्द बातमीच्या अनुषंगाने मुद्येनिहाय सविस्तर खुलासा व वस्तुस्थिती सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी दि.०९/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंडळाचे अभिप्राय मा. प्रधान सचिव, कामगार विभाग, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मा. कामगार आयुक्त व मा. कामगार मंत्री महोदयांचे खाजगी सचिव, यांचेकडे सादर केला आहे.
ड)	तत्कालीन कामगार आयुक्त यांनी वरील अ), ब) व क) च्या पार्श्वभूमीवर दि.१६.१०.२०१८ रोजी शासनास सादर केलेले पत्र.	तत्कालीन कामगार आयुक्त यांनी त्यांच्या दि.१६/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या विविध मुद्यांबाबत शासनाच्या दि. २०/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कामगार आयुक्त यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.
इ)	महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी यांनी या निविदा प्रक्रियेबाबत मागविलेली माहिती.	महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी यांनी त्यांच्या दि.०६/१२/२०१८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विचारणा केलेल्या मुद्यांबाबत मुद्येनिहाय माहिती सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी त्यांच्या दि.३१/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कामगार आयुक्त यांच्याकडे सादर केली आहे. सदर माहिती शासनाच्या दि.२४/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त मान्यतेअंती महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग या कार्यालयास कामगार आयुक्त यांचे कार्यालयाकडून सादर करण्यात आली आहे.

२. सदस्य सचिव खरेदी समिती यांनी दि.१८/०२/२०१९ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार दि.२०/०२/२०१९ रोजी सर्व न्यूनतम निविदाधारकांना (L१) दर कमी करण्याबाबत पत्र ई-मेलद्वारे पाठविले होते. त्यानुसार तीनही गटातील न्यूनतम निविदाकारांनी (L१) त्या अनुषंगाने दर कमी करून तशा आशयाचे लेखी पत्र ई-मेलद्वारे मंडळास सादर केलेले आहेत.

सदस्य सचिव यांनी दि.२०.०२.२०१९ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावात खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता नमूद केलेला आहे.

अ. क्र.	गटाचे नाव	निविदा क्र.	न्यूनतम निविदाकार	निविदेतील प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन दर रू.	सुधारित कमी केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन दर रू.
१.	मुंबई व नवी मुंबई, औरंगाबाद विभाग	०४	मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि.	६३.५२/-	६२.७५/-
२.	नाशिक व कोकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून)	०५	मे.इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि	६३.४०/-	६२.७३/-
३.	पुणे विभाग, अमरावती विभाग व नागपूर विभाग	०६	मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी	६३.०७/-	६२.७०/-

३. सदस्य सचिव यांनी पुढे असेही नमूद केले की, मंडळाचे ई-गर्व्हनंर्स सल्लागार मे. केपीएमजी यांनी राज्यातील ३ गटाकरिता मध्यान्ह भोजन योजनेच्या पुरवठयाकरिता संस्था निश्चितीसाठी प्रसिद्ध करावयाच्या ई-निविदा सुचनेचे प्रारुप (RFP) तयार करताना विचारात घेतलेले अंदाजपत्रकीय दर व ३ गटाकरिता न्यूनतम निविदाकारांनी निविदेसोबत सादर केलेले दर आणि दि. २०.०२.२०१९ रोजीच्या मंडळाच्या पत्राच्या अनुषंगाने सुधारित कमी केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन दराचा बाबनिहाय तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	निविदेतील बाबी	ई-गर्व्हनंर्स सल्लागार मे. केपीएमजी यांनी दिलेले अंदाजपत्रकीय दर	मे. गुनिना कर्मशियल प्रा. लि.	मे. इन्डो अलाईड प्रोटिन फुडस प्रा. लि.	मे. पारसमल पगारिया ॲन्ड कंपनी
१.	मेन्यु टाईप- ०१/०२	२९.४०	२७.७३	२६.८५	२६.८५
२.	वाहतूक व वितरण	५.२५	८.४०	९.०७	९.५२
३.	मनुष्यबळ	१६.९२	१२.८८	१२.७७	१२.६०
४.	कार्ड डिस्ट्रीब्युशन सिस्टिम	२.६४	४.८२	५.०४	४.४८
५.	जीएसटी (१८%)	९.७७	९.६९	९.६७	९.६२
६.	प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन एकुण दर रु.	**६३.९८**	**६३.५२**	**६३.४०**	**६३.०७**
७.	सुधारित कमी केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन एकुण दर रू.	-	**६२.७५/-**	**६२.७३/-**	**६२.७०/-**

४. सदस्य सचिव खरेदी समिती यांनी पुढे असेही नमुद केले की मंडळाच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या ठरावानुसार नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकडुन प्रति लाभार्थी प्रति भोजन रू.५/- एवढा दर आकारण्यात येणार आहे. संबंधित पुरवठादार लाभार्थ्यांकडून सदर रक्कम वसूल करतील व मंडळ त्यांच्या देयकातून प्रति लाभार्थी प्रति भोजन रू.५/- दराने रक्कम कपात करून मंडळाच्या खात्यात जमा करणार आहे.

वरील अनुक्रमांक १,२,३ व ४ परिच्छेदामधील नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

अ) शासनाच्या दि.२१/०२/२०१९ रोजीच्या पत्रातील सूचनेप्रमाणे वरीलप्रमाणे न्यूनतम निविदाकारांनी कमी केलेले दर शिफारशीसह राज्य शासनास मान्यतेस/निर्णयास्तव पाठवावेत.

ब) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी वरीलप्रमाणे प्रस्ताव शासनास पाठवावा.

बैठकी अंती सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या संमतीने बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

(अशोक तांबे)
लेखा अधिकारी
तथा सदस्य, खरेदी समिती

(शशांक साठे)
उप सचिव (कामगार)
तथा सदस्य खरेदी समिती

(श्री. चु. श्रीरंगम)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
तथा सदस्य सचिव, खरेदी समिती

(आर.आर. जाधव)
कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
खरेदी समिती

Signature Not Verified
Digitally signed by Shrikishan C Shrirangam
Date: 2019.03.25 13:20:09 IST
Location: Maharashtra